

स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद – कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे,

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

ता. पलूस, जि. सांगली



# अर्थशास्त्र विभाग व सांस्कृतिक विभाग

दि. १ जानेवारी २०२४.

## 'वन कलर डे' कार्यक्रमाचा अहवाल

रयत शिक्षण संस्थेचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर (बुर्ली), अर्थशास्त्र व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत महाविद्यालयात सोमवार दि. १ जानेवारी २०२४ रोजी 'वन कलर डे' साजरा करण्यात आला. सदर दिवशी महाविद्यालयातील सर्व स्टाफ व विद्यार्थी महाविद्यालयाने ठरवून दिलेल्या रंगाचे (निळा) कपडे परिधान करून आले होते. 'वन कलर डे' चा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्रांगणात अतिशय आनंदी वातावरणामध्ये पार पडला. कार्यक्रमाच्या सुरवातीस महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या व कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा. डॉ. यु. व्ही. पाटील यांनी सर्व उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाच्या समन्वयक व अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. पी. बी. पाटील यांनी उपस्थितांना निळया रंगाचे महत्व सांगितले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सदर दिवशी संगीत खुर्ची स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत वरिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांसोबत कनिष्ठ विभागातील विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धेत बाद होणाऱ्या स्पर्धकास मंचावर येऊन कांही ना कांही कृती करण्याची शिक्षा ठेवली असल्याने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अश्विनी तातुगाडे व श्रीमती नम्रता कांबळे यांनी केले तर आभार डॉ. अमोल कांबळे यांनी मानले.

**फलनिष्पत्ती:**

1. सहभागी सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनी व प्राध्यापकांना निळया रंगाचे महत्व उमजले.
2. सहभागी सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनी व प्राध्यापक यांना एकतेच्या भावनेचे महत्व समजले.

**लाभार्थी: १५६**

Scanned with OKEN Scanner













वन कलर डे कार्यक्रमातील सहभागी विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्राध्यापक वर्ग

समन्वयक

प्रमुख
सांस्कृतिक विभाग

प्राचार्य
प्र. प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.

Scanned with OKEN Scanner